श्री व्यंकटेश महाविद्यालयात डॉ. एस. आर. रंगनाथन यांची जयंती साजरी

"भारतातील ग्रंथालय चळवळीचा विकास डॉ. एस. आर. रंगनाथन यांच्यामुळे झाला. त्यांनी सांगितलेले पाच नियम आजही  ग्रंथालय कामकाजासाठी उपयुक्त ठरत आहेत. ग्रंथालय शास्त्रामध्ये त्यांनी भरीव कामगिरी केली आहे. त्यांनी कोलन वर्गीकरण, दर्शनी वर्गीकरण, मद्रास सार्वजनिक ग्रंथालय कायदा यामध्ये मोलाचे कार्य केले आहे.त्यांच्या या कामगिरीचा विचार करून त्यांना ग्रंथालयशास्त्राचे जनक ही पदवी देण्यात आली आहे. 1957 साली पद्मश्री देऊन त्यांचा सन्मान करण्यात आला आहे." असे प्रतिपादन डॉ. व्ही. ए. माने यांनी केले. ते श्री व्यंकटेश महाविद्यालय, इचलकरंजी येथे डॉ. एस. आर. रंगनाथन जयंती कार्यक्रमांमध्ये बोलत होते. आज आज राष्ट्रीय ग्रंथपाल दिन असल्याने याप्रसंगी महाविद्यालयामार्फत ग्रंथपाल श्री. एम. पी. केसरकर व  सर्व ग्रंथालय परिचर यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले. यावेळी महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभागामार्फत व्यसनमुक्ती शपथ देखील घेण्यात आली. यावेळी ग्रंथपाल श्री. एम. पी. केसरकर यांनी डॉ. एस. आर. रंगनाथन यांच्या कार्याची ओळख करून दिली. याप्रसंगी उपप्राचार्य डॉ. बी. एन. कांबळे , फिजिकल डायरेक्टर श्री. अमिन बाणदार, ग्रंथपाल श्री. एम.पी.केसरकर , अधीक्षक अनोष गायकवाड व शिक्षक- शिक्षकेतर कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

